Sakal, Monday, 7th March, 2011, Page No. 6

# ... अवकाशाएवढा !

'आयुका'ची जडणघडण इतक्या कमी वेळात कशी केली, यावर डॉ. जयंत नारळीकरांकडे उत्तर आहे. ते म्हणतात- मला हे शक्य झाले कारण मला वेळोवेळी चांगले सहकारी लाभत गेले.नव्या संस्थेत वातावरण शैक्षणिक नसेल, तर चांगला शास्त्रज्ञ संस्थेत येणार नाही म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या कामाचा ठसा उमटवलेल्या शास्त्रज्ञांना 'आयुका'त मानाने आमंत्रित करण्यात आले. या सर्वांच्या बरोबर भावी पिढीला विज्ञानाकडे आकर्षित करण्याकरिता आणि सर्वसामान्यांच्या जिज्ञासांचे निरसन योग्य प्रकारे करण्याकरिता विज्ञानप्रसाराच्या कार्यालाही इथे प्रमुख स्थान देण्यात आले आहे. मला गेल्या वीस वर्षांच्या काळात त्यांच्याबरोबर काम करण्याची आणि तेही खूप जवळून काम करण्याची संधी मिळाली ती डॉ. नारळीकरांच्या आवडत्या क्षेत्रात- विज्ञानप्रसाराच्या क्षेत्रात. त्यांच्याबरोबर काम करताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काहीसे दडपण सदैव असतेच; पण त्यांचे व्यक्तिमत्त्वच इतके प्रसन्न आहे की त्यांच्याबरोबर काम करताना नेहमीच मजा आली.



डॉ. जयंत नारळीकर

'आयुका'तल्या कर्मचाऱ्यांसाठी घरे हा नारळीकरांच्या अनुभवाचे आणि दूरदृष्टीचे आणखी एक उदाहरण. 'आयुका'च्या मुख्य इमारतीच्याही आधी बांधून झालेल्या 'आयुका'तल्या या कॉलनीचे नाव आहे आकाशगंगा. याच घरांमध्ये आयुकाचे वाचनालय आणि संगणक केंद्रही होते. वक्तशीरपणा हा डॉ. नारळीकरांच्या स्वभावातला खास पैलू. 'आयुका'तच मराठी विज्ञान लेखकांचे संमेलन होते. दुपारच्या जेवणाच्या आधीचे सेशन थोडे लांबले. ठरले होते की पुढचा वेळ लक्षात घेता सर्वांनी बरोबर दोन वाजता सभागृहात यावे. नारळीकरांनीही इतरांबरोबरच जेवण घेतले. आपले काही बारीकसारीक काम केले आणि बरोबर दोन वाजता रिकाम्या सभागृहात आपल्या जागी स्थानापन्न पण झाले. त्यांची वेळेवर इतकी हुकूमत आहे की त्यांना जर एखाद्या मुलाखतीत दोन मिनिटे बोलायला सांगितले, तर ते खरंच फक्त एकशे वीस सेकंद बोलतात आणि ते ही सुरवातीपासून शेवटपर्यंत अगदी सुसंबद्ध. संचालक म्हणून असे प्रसंग अनेकदा आले असतील, की त्यांनी घेतलेला निर्णय एखाद्याला पसंत न पडणारा असू शकेल. पण त्यांनी कोणाला कधी दुखावलेले नाही. एवढा मोठा शास्त्रज्ञ; पण तितकाच साधा आणि निगर्वी. 'आयुका'त विज्ञान दिनाच्या निमित्ताने आलेल्या काही स्वयंसेवकांशी एकदा मी त्यांची ओळख करून देत होतो. सर्वांची ओळख करून दिल्यानंतर एकाने सरांना विचारले, 'आपण कोण?' त्याचा तो प्रश्न ऐकून आम्ही सगळे स्तब्धच झालो. पण जयंतरावांनी त्याला दिलेले उत्तर आज पंधरा वर्षांनीही कोणीच विसरलेले नाही. ते दोन पावले मागे गेले आणि म्हणाले, 'बरोबर आहे. आधी माझी ओळख करून द्यायला हवी होती. माझे नाव जयंत नारळीकर. मी या संस्थेत काम करतो.'

**अरविंद परांजपे**